# महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ

(संलग्न भारतीय मजदूर संघ)

नोंदणी क्रमांक पी.एन./३९७८/दिनांक ६/२/२००९

महानिर्मिती महाराष्ट्र राज्यविद्युत निर्मिती कंपनी मर्यादित
महा पारेषण महाराष्ट्र राज्यविद्युत पारेषण कंपनी मर्यादित
महा वितरण महाराष्ट्र राज्यविद्युत वितरण कंपनी मर्यादित

# कामगार संदेश

वर्ष : १ ले अंक : २ रा परिपत्रक क्र. : २ दि. २३ ऑगस्ट २०२३

पुणे : २३ जुलै २०२३ वीज उद्योगातील कंत्राटी कामगारांसाठी वीज उद्योगात झालेल्या घडामोडींची माहिती व्हावी या साठी भारतीय मजदूर संघाच्या ६८ व्या वर्धापन दिना निमित्त दर महिन्याला कामगार संदेश माहितीपत्र महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाच्या वतीने प्रसिध्द करण्यात येणार आहे. या कामगार संदेश : माहिती पत्राचे प्रकाशन मा. श्री. बाळासाहेब फडणवीस यांच्या हस्ते झाले.त्या कार्यक्रमाची क्षणचित्रे.






भारतीय मजदूर संघाशी संलग्न असलेल्या अनेक संघटनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची मिटिंग पुणे कार्यालयात संपन्न झाली. भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय महामंत्री मा.रविंद्रजी हिंमते, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अनिल ढुमणे, महामंत्री मोहन येनुरे, संघटन मंत्री श्रीपाद कुटासकर व अनेक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# सर्व कोर्ट केसेस ची माहिती...

राज्यातील वीज कंत्राटी कामगार जे महावितरण कंपनीतील नियमित मंजूर रिक्त पदांच्या जागेवर काम करत आहे यांना त्याच पदावर कायम करावे या मागणी साठी महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाने आज पर्यंत कायदेशीर मार्गाने न्यायालयीन प्रक्रिया करून साधारण सहा कोर्ट केसेस केलेल्या आहेत व या कोर्ट केस च्या माध्यमातून या केस मध्ये सुमारे ७०१४ कंत्राटी कामगार समाविष्ट आहेत. या सर्व केसेस ची आपण माहिती देत आहोत.

१) महावितरण केस नंबर ४८ / २०१२ ही केस ठाणे कोर्ट येथे मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशा नुसार चालू २०१३ पासून चालू असून यात एकूण १३६२ कामगार असून यांना कामावरून कमी करू नये असे आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाचे आहेत. ही कोर्ट केस आता शेवटच्या टप्प्यात असून लवकरच याचा अंतिम निकाल लागणार आहेत आजवर या कोर्ट केसच्या साधारण १८५ सुनावण्या झालेल्या असून ३१ ईव्हीडन्स दाखल केलेले आहेत या केस ची पुढील तारीख ८ सप्टेंबर २०२३ आहे.

पान क्र २ वर ...

पान १ वरुन...

२ ) महावितरण केस नंबर २१ / २०१८ ही केस बांद्रा कोर्ट येथे चालू असून यामध्ये १८९६ कामगार समाविष्ट असून यांना कामावरून कमी करू नये असे मा.कोर्टाचे ८ डिसेंबर २०20 चे आदेश आहेत. या कोर्ट केस च्या साधारणपणे ७० सुनावण्या झाल्या असून या कोर्ट केसची पुढील तारीख २८ ऑगस्ट २०२३ आहे.

३) महावितरण केस नंबर ३३ / २०१९ ही केस बांद्रा कोर्ट येथे चालू असून या केस मध्ये १३३५ कामगार समाविष्ट असून
यांना कामावरून कमी करू नये असे मा.कोर्टाचे १६ सप्टेंबर २०20 चे आदेश आहेत या केसच्या साधारण ५१ सुनावण्या झाल्या आहेत या केसची पुढील तारीख २८ ऑगस्ट २०२३ आहे.

४ ) महापारेषण केस नंबर ३४ / २०१९ ही कोर्ट केस बांद्रा कोर्ट येथे चालू असून या केस मध्ये महापारेषण कंपणीतील मधील ८९ कामगार समाविष्ट असून आत्तापर्यंत साधारण ५३ सुनावण्या झाल्या असून लवकरच या केसमधील कामगारांना कामावरुन कमी करू नये असे आदेश मिळतील या केसची पुढील तारीख ५ सप्टेंबर २०२३ आहे.

५ ) महापारेषण केस नंबर १७ / २०२२ ही कोर्ट केस बांद्रा कोर्ट येथे चालू असून या केस मध्ये महापारेषण कंपनीचे १४२ कामगार समाविष्ट असून आत्तापर्यंत साधारण ६ सुनावण्या झाल्या असून लवकरच या केसमधील कामगारांना कामावरुन कमी करू नये असे आदेश मिळतील या केसची पुढील तारीख २९ ऑगस्ट २०२३ अशी आहे.

६) महावितरण केस नंबर १८ / २०२२ ही केस बांद्रा कोर्ट येथे चालू असून या केस मध्ये महावितरण कंपनीचे २८९० कामगार समाविष्ट असून आत्तापर्यंत साधारण ७ सुनावण्या झाल्या असून लवकरच या केसमधील कामगारांना कामावरुन कमी करू नये असे आदेश मिळतील या केसची पुढील तारीख ३० सप्टेंबर २०२३ अशी आहे.

अशा प्रकारे एकुण ७७१४ कामगारांना न्याय मिळावा यासाठी संघटनेने कोर्टामध्ये धाव घेतली आहे. त्याला यश देखील आले आहे.दिनांक ५ एप्रिल २०२३ रोजी प्रकाशगड मुख्य कार्यालय मुंबई यांनी सर्व झोन चे मुख्य अभियंता व उप औद्योगिक संबंध अधिकारी यांच्या कडे कोर्ट केस लिस्ट पाठवल्या आहेत.

संघटना आपले काम व्यवस्थित करीत आहे मात्र कामगारांनी सुद्धा आपल्या जबाबदारी ओळखून संघटनेला वेळोवेळी सहकार्य करने गरजेचे असून प्रत्येक कामगारांनी आपली वार्षिक सभासद फी व वार्षिक कोर्ट केस फी वेळेत भरली पाहिजे तसेच वेबसाईटवर आपली माहिती अपडेट करून घेतली पाहिजे. व आपले नाव आपल्या कोर्ट केस सिरीयल नंबर ला जोडून घेतले पाहिजे. कोर्ट केस मध्ये नाव आहे पण कामावरून कमी केले अशा कामगारांनी आपली सर्व माहिती आपल्या झोन च्या अध्यक्ष यांच्याकडे द्यावी.

तसेच सर्व झोनचे अध्यक्ष यांनी आप आपल्या झोन मधील कोर्ट केस मध्ये नाव असलेल्या ज्या ज्या कामगारांना कामावरून कमी केले असेल त्यांची नावे तयार करून पत्राद्वारे आप आपल्या झोनचे मुख्य अभियंता व उप औद्योगिक संबंध अधिकारी यांच्या कडे पत्र व्यवहार करावा. या पत्र व्यवहाराची एक प्रत संघटनेच्या केंद्रीय अध्यक्ष / सचिव यांना द्यावी

---




भारतीय मजदूर संघाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या मध्ये कंत्राटी कामगारांच्या विविध विषयांवर चर्चाभारतीय मजदूर संघाच्या १५५ वी राष्ट्रीय कार्यकारिणी बैठक चुनार, वाराणसी येथे १८ /१९ व २० ऑगस्ट २०२३ रोजी उत्साही वातावरणात संपन्न झाली. या वेळी कामगारांच्या विविध विषयांवर मिटींगमध्ये चर्चा झाली. तसेच आगामी योजना करिता चर्चा करण्यात आली. या वेळी कंत्राटी कामगारांच्या प्रश्नांवर,विविध विषयांवर आंदोलने, राज्यातील कंत्राटी कामगारांची आंदोलनाची माहिती राष्ट्रीय कार्यकारिणी मिटींग मध्ये अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघाचे महामंत्री सचिन मेंगाळे यांनी दिली.



## महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची नागपूर येथे बैठक

उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या वतीने सोमवार दिनांक १४ ऑगस्ट २०२३ रोजी नागपूर च्या रवीभवन येथे एक बैठक म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक मा विश्वासजी पाठक यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली होती. या बैठकीमध्ये महावितरण महापारेषण व महानिर्मिती चे पदाधिकारी सामील झाले होते. कंत्राटदारांच्या विळख्यातून कंत्राटी कामगारांची मुक्तता करण्यासाठी तिन्ही वीज कंपनीत कंत्राटदार विरहित व वयाच्या ६० वर्षा पर्यंत कामगारांना रोजगार मिळाला पाहिजे ही संघटनेची भूमिका सांगून राज्यातील कंत्राटी कामगारांचे आज कशा प्रकारे आर्थिक शोषण केले जाते या बाबत सर्व माहिती देण्यात आली. धोरणात्मक निर्णयावर ऊर्जामंत्री यावर तोडगा काढू शकतील या साठी संघाला ऊर्जामंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या भेटीची वेळ मिळावी अशी मागणी या बैठकीत करण्यात आली.

महाराष्ट्र वीज कामगार संघ व कंत्राटी कामगार संघाचे प्रमुख पदाधिकारी या मिटिंग साठी उपस्थित होते.

## महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाची पुणे येथे साप्ताहिक बैठक संपन्न



मंगळवार दिनांक ०८ ऑगस्ट २०२३ रोजी विश्वकर्मा भवन कार्यालय,१८५,शनिवार पेठ येथे पुणे झोनमधील वीज कंत्राटी कामगारांची साप्ताहिक मीटिंग घेण्यात आली या मीटिंग मध्ये येणारा काळ हा संघर्षाचा आहे आणि या संघर्ष काळात पुणे झोनमधील सर्व वीज कंत्राटी कामगारांनी एकजूट ठेऊन संघटनेच्या पाठीशी पूर्ण ताकतीने उभे रहावे असे आव्हान संघटनेचे केंद्रीय उपमहामंत्री मा श्री राहुल बोडके यांनी केले या साप्ताहिक मीटिंग मध्ये संघटनेचे प्रादेशिक सहसंघटनमंत्री मा मार्गदीप म्हस्के, पुणे झोन अध्यक्ष मा सुमित कांबळे,सचिव मा निखिल टेकवडे तसेच सर्व डिव्हिजन पदाधिकारी व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते




# संघटित व असंघीटत क्षेत्रातील कामगारांनी एकत्रित येवुन न्याय मागण्यासाठी करिता संघर्ष करणार : भारतीय मजदूर संघ

मागील काही वर्षांपासून सरकारने विविध कारणे दाखवून, सरकारी ऊद्योगांचे खाजगीकरण, कॉरपोरेशन निर्माण करून कामगारांनी लढाई करून मिळविलेले कायदे, सेवा शर्ती एकतर्फीपणे काढून घेण्याचा सपाटा लावला आहे. तसेच संरक्षण,विमा, वीज, रेल्वे, सरकारी ऊद्योगातील कामगारांचे देशाच्या आर्थिक विकासाचा मध्ये महत्वपूर्ण योगदान राहिलेले आहे. असंघीटत क्षेत्रातील कामगारांच्या विविध समस्या, लाभांच्या योजना सरकार दरबारी प्रलंबित आहेत. त्यामुळे संघटीत, असंघीटत क्षेत्रातील कामगारांनी एकत्रित येवुन अधिक संघर्षशील होण्याची आवश्यकता आहे. कामगारांनी एकत्रित येवुन कामगार क्षेत्रातील आव्हानांचा मुकाबला करावा असे आवाहन भारतीय प्रतिरक्षा मजदूर संघाचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य श्री.संजय मेनकुदळे यांनी भारतीय मजदूर संघाच्या ६८ व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने पुणे जिल्हा च्या कामगार मेळाव्यात केले.

भारतीय मजदूर संघाच्या विश्वकर्मा भवन शनिवार पेठ पुणे येथील नुतनीकरण झालेल्या कार्यालयात २३ जुलै २०२३ रोजी लोकार्पण सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी जेष्ठ मार्गदर्शक श्री.बाळासाहेब फडणवीस, पुर्व महामंत्री श्री.उदयराव पटवर्धन, जेष्ठ मार्गदर्शक मुकुंदराव गोरे, संजय सफई, अनिल फौजदार, हरी सोवनी, भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष श्री.अनिल ढुमणे, महामंत्री मोहन येणूरे व अन्य पदाधिकारी व कामगार उपस्थित होते.

या प्रसंगी भामसंघ् प्रदेश अध्यक्ष श्री.अनिल ढुमणे म्हणाले की गेल्या ६८ वर्षा मध्ये कामगारांनी चळवळीत त्याग तपस्या व बलिदान दिले आहे. भारतीय मजदूर संघाचे महत्वपूर्ण योगदान म्हणजे सर्वसामान्य श्रमिकांना माणूस म्हणून किंमत समाजात मिळवून देण्यासाठी महत्त्वाचे योगदान आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व परिचय अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघाचे सरचिटणीस सचिन मेंगाळे यांनी केले. मागील वर्षातील महत्वपूर्ण घटनांचा कार्य अवहाल पुणे जिल्हा सचिव श्री बाळासाहेब भुजबळ यांनी मांडला तर अध्यक्षीय समारोप व आभार पुणे जिल्हा अध्यक्ष श्री अर्जुन चव्हाण यांनी केले.

मेळावा यशस्वीपणे करण्यासाठी भारतीय मजदूर संघ पुणे जिल्हा पदाधिकारी, उमेश विश्वाद,विवेक ठकार, निलेश खेडकर, राहूल बोडके,उमेश आणेराव, सागर पवार, वंदना कामठे, सुमित कांबळे, निखिल टेकवडे, प्रवीण पवार यांनी महत्वपूर्ण योगदान दिले.




## भारतीय मजदूर संघाचा वर्धापन दिनाच्या निमित्ताने वीज कामगार महासंघाचा रक्तदानाचा महायज्ञ

भारतीय मजदूर संघाच्या ६८ व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने व संस्थापक श्रद्धेय दत्तोपंत ठेंगडीजी , तसेच महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे संस्थापक कै.बाळासाहेब साठ्ये,आण्णाजी अकोटकर या कामगार क्षेत्रातील त्रिमुर्तींचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करण्यासाठी विविध समाज उपयोगी कार्यक्रम वर्षभर राबविण्याची भूमिका कामगार महासंघाने घेतली होती. त्यातील एक स्तुत्य कार्यक्रम म्हणजेच संपूर्ण महाराष्ट्रात ३६ जिल्ह्यात एकाच दिवशी महारक्तदान शिबिराचे आयोजन वीज कामगार महासंघाने केले होते. पुणे झोनच्या वतीने १०१ कार्यकर्त्यांनी सौदामिनी सभागृह मंगळवार पेठ पुणे येथे रक्तदान शिबीरात उपस्थित राहून आपला सहभाग नोंदवला.सर्व रक्तदात्यांना मान्यवरांचे हस्ते प्रमाणपत्र, टूल किट, टीफीन,भेट स्वरूपात देण्यात आले.

महावितरण प्रशासनाचे वतीने पुणे झोनच्या वतीने मा.उपमुख्य औद्योगीक संबध अधिकारी शिरीष काटकर रास्ता पेठ सर्कलचे अधिक्षक अभियंता मा अरविंद बुलबुले, पुणे ग्रामीण सर्कलचे अधिक्षक अभियंता मा युवराज जरग, गणेशखिंड सर्कलचे अधिक्षक अभियंता मा.संजीव राठोड तसेंच भारतीय मजदूर संघाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अडव्होकेट अनिल ढुमणे उपस्थित होते. या शिबिराचे नियोजन महाराष्ट्र वीज कामगार महासंघ पुणे झोन वितरण व पारेषण कार्यकारिणी वतीने संयुक्तपणे यशस्वीतेसाठी महत्वपूर्ण योगदान दिले आहे.

# महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ संलग्न भारतीय मजदूर संघ परिचय

महाराष्ट्रातील वीज उद्योगांमध्ये अनेक प्रस्थापित संघटना असताना राष्ट्रहित उद्योगहित व कामगार हित या भारतीय मजदूर संघाच्या त्रिसूत्रीने प्रेरित होऊन वीज कामगार महासंघाच्या सहकार्याने कंत्राटी कामगारांनी कंत्राटी कामगारांसाठी सुरू केलेल्या महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाची स्थापना पुणे येथे २००६ साली झाली. सुरुवातीला वीज कामगार महासंघाने मोठे पाठबळ या कामगारांना दिले, कोणताही भेदभाव न बाळगता सर२ मदत केली. मुख्य म्हणजे भारतीय मजदूर संघाशी संलग्न अशी स्वतंत्र संघटना स्थापन केली. पुढे या संघटनेची सरकार दरबारी अधिकृत नोंदणी ६ फेब्रुवारी २००९ रोजी झाली. पुणे शहरातील कोथरूड विभागामध्ये लावलेले हे छोटेसे रोपटे आज महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यातील महावितरण महापारेषण आणि महानिर्मिती कंपनीतील सुमारे १५,००० वीज कंत्राटी कामगारांचे खंबीरपणे नेतृत्व करत असून आपल्या देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी यांच्या डिजिटल इंडियातून प्रेरणा घेऊन संघटनेने आपले सर्व व्यवहार सभासद नोंदणी हे ऑनलाईन पद्धतीने सुरू केले. ु.ीज्ञझीरपसह.लो या नावाची संघटनेची स्वतंत्र वेबसाईट असून तीनही वीज कंपनीतील कंत्राटी कामगारांच्या हितार्थ तीन स्वतंत्र मोबाईल प ची निर्मिती केली आहे. कोरोना काळामध्ये काही कंत्राटी कामगारांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबाला आर्थिक आधार मिळावा या विचाराने कामगारांना पेड विमा योजना सुरू केली या माध्यमातून १० लाख रुपयांची रक्कम अपघातात मृत कंत्राटी कामगाराच्या कुटुंबाला मिळवून दिली. मात्र राज्यातील अनेक कंत्राटी कामगारांना या विमा योजनेच्या प्रमियमचे पैसे सुद्धा भरता येणे कठीण होत असल्याचे लक्षात आले हे पाहून कोल्हापूर च्या पदाधिकारी यांच्या माध्यमातून एच.डी.एफ.सी या बँके सोबत विशेष कराराद्वारे हजारो वीज कंत्राटी कामगारांचे सॅलरी अकाउंट काढून त्या माध्यमातून प्रत्येक वीज कंत्राटी कामगाराला ११ लाख रुपयाचा अपघात विमा मिळवून देण्याचा संघटनेने प्रयत्न केला. कोविड काळामध्ये मा.आरोग्य मंत्री यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत संघटने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिराच्या माध्यमातून अनेक कंत्राटी कामगारांनी रक्तदान केले. कोरोना काळामध्येच सामाजिक भान राखत मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाकडे एक लाख रुपयांचा निधी जमा केला. वीज कंत्राटी कामगारांना अभ्यास वर्गाच्या माध्यमातून माहिती अधिकार प्रशिक्षण तसेच सेफ्टी ट्रेनिंग देण्यात आले. डिसेंबर २०२२ मध्ये संघटनेचे पाचवे त्रैवार्षिक अधिवेशन रेशीम बाग नागपूर येथे संपन्न झाले महाराष्ट्र सह देशपातळीवर अखिल भारतीय पातळीवर अनेक राज्यातील वीज कंत्राटी कामगारांचे संघटन स्थापन केले. २३ जुलै २०२३ रोजी भारतीय मजदूर संघाच्या ६८ व्या वर्धापनदिन दिवशी कामगारांसाठी कामगार संदेश पत्रकाचे मासिक प्रकाशन सुरू केले. अशा प्रकारे भारतीय मजदूर संघाच्या त्रिसूत्रीला अनुसरून महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ या राज्यातील व देशातील वीज उद्योगात कार्यरत असलेल्या सर्व वीज कंत्राटी कामगारांच्या हितार्थ कटिब्धतेने राष्ट्रहित, उद्योगहित व कामगारहित जोपासण्याचा प्रयत्न करत आहे.

# ESIC म्हणजे काय? कसा मिळवाल योजनेचा फायदा

नोकरदार वर्गाला पीएफशिवाय, सरकारकडून ईएसआयसी (ESIC)अर्थात राज्य कर्मचारी विमा योजना दिली जाते. या योजनेअंतर्गत कर्मचाऱ्यांच्या आरोग्य सुविधांसह इतरही फायदे दिले जातात.

ESIC काय आहे? ESIC कर्मचारी विमा योजना आहे. सरकारी आणि खासगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी ही आरोग्य विमा योजना आहे. ज्या संस्थेमध्ये १० ते २० कर्मचारी किंवा त्याहून अधिक कर्मचारी असल्यास ही योजना लागू होते. केंद्रीय कामगार व रोजगार मंत्रालयाच्या अंतर्गत ही योजना चालविली जाते.

ESIC मध्ये कर्मचारी आणि कंपनी, या दोघांच्या रक्कमेचं योगदान असतं. ही रक्कम वेळो-वेळी बदलत असते. सध्या ईएसआयसीमध्ये कर्मचाऱ्यांच्या वेतनातून ०.७५ टक्के योगदान दिलं जातं आणि कंपनीकडून ३.२५ टक्के योगदान असतं. ज्या कर्मचाऱ्याचं दररोजचं वेतन १३७ रुपये आहे, त्यांना आपल्या वेतनातील योगदान द्यावं लागत नाही. ईएसआयसीमध्ये कर्मचाऱ्यांच्या वेतनाची मर्यादा आहे. २१ हजार रुपयांपर्यंत वेतन असलेले कर्मचारी या योजनेंतर्गत येतात, या योजनेचा लाभ घेऊ शकतात. यापूर्वी मासिक वेतनाची मर्यादा १५ हजार रुपये इतकी होती. परंतु २०१६ मध्ये ती वाढवून २१ हजार रुपये करण्यात आली.

काय आहेत फायदे? ESIC योजनेंतर्गत कर्मचारी आणि त्याच्या कुटुंबाला वैद्यकिय सुविधा पुरवल्या जातात. तब्येत बिघडल्यास मोफत इलाजाची सुविधा मिळते. एड्खउच्या रुग्णालयात कर्मचाऱ्यांना मोफत इलाज केला जातो. गंभीर आजार असल्यास खासगी रुग्णालयात पाठवले जाते. खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आल्यानंतर इलाजाचा संपूर्ण खर्च एड्खउद्वारा केला जातो. कर्मचारी एखाद्या गंभीर आजाराने नोकरी करण्यास असमर्थ असल्यास एड्खउ कडून कर्मचाऱ्याला पगाराच्या ७० टक्के रक्कम देण्यात येईल. जर कर्मचारी काही कारणामुळे अपंग झाल्यास, त्याला पगाराच्या ९० टक्के रक्कम दिली जाईल. कायमस्वरुपी अपंगत्वावर आजीवन पगाराच्या ९० टक्के वेतन दिले जाते.

महिलांसाठी - ESICमध्ये महिलांना प्रसूती रजा दिली जाते. प्रसूती रजेसह ६ महिन्यांचं वेतनही दिलं जातं. ६ महिन्यांचं वेतन एड्खउ कडून देण्यात येतं. काही कारणास्तव गर्भपात झाल्यास, ६ आठवड्यांची वेगळी सुट्टीही देण्यात येते.
कर्मचाऱ्यांच्या मृत्यूनंतरही एड्खउचा फायदा मिळतो. कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर कुटुंबातील सदस्यांना पेन्शन सुविधा लागू होते. पेन्शन तीन भागात विभागलं जातं. पहिले, कर्मचाऱ्याच्या पत्नीला, दुसरं मुलांना आणि तिसरं कर्मचाऱ्याच्या आई-वडिलांना दिलं जातं.
कसं कराल रजिस्ट्रेशन? कंपनीकडून एड्खउचं रजिस्ट्रेशन केलं जातं. यासाठी कुटुंबातील सदस्यांची माहिती द्यावी लागते. कंपनीला नॉमिनीचंही नाव द्यावं लागतं. रजिस्ट्रेशनच्या ९ महिन्यांनंतर एड्खउची सुविधा मिळण्यास सुरुवात होते.
राज्यातील प्रत्येक वीज कंत्राटी कामगाराने आपल्या फॅमिली फोटो घेऊन एड्खउ कार्ड अपडेट केले पाहिजे व कंत्राटदार बदलल्यानंतर या कार्ड साठी आग्रही राहिले पाहिजे.
केवळ कार्ड काढून उपयोग नाही तर कार्ड मिळाल्या मिळाल्या नंतर त्या कामगाराने त्याच्या नजदिकच्या एड्खउ डॉक्टरांकडे जाऊन त्यांच्या कडून सिस्टीम मध्ये एकदा आपल्या नावाची पुन्हा नोंद करून घेतली पाहिजे. म्हणजे पुढे याचा आपल्याला उपयोग होतो.

# मर्म भेद

# माझी संघटना माझी जबाबदारी

संघटना म्हणजे कामगारांचा समूह.कामावर असतांना ज्या विविध कायदेशीर बाबी मिळणारे लाभ याच्या पासून कामगार वंचित राहू नये त्याला सर्व लाभ मिळावे शासन प्रशासन कंत्राटदार यांच्याकडून अन्याय झाल्यास त्या विरोधात समूहाने लढल्यास न्याय नक्कीच मिळतो या साठी संघटना स्थापन झाल्या. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी पण एक संदेश आपल्याला दिला शिका संघटित व्हा व संघर्ष करा. वीज उद्योगात भारतीय मजदूर संघाशी संलग्नित होऊन महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ २००९ साली नोंदणीकृत झाला. कामगारांच्या हिताची कामे सुरू केली व कामगार एकत्र येत गेला. काना मागून आला व गोड झाला असा शब्द प्रयोग संघटनेला उत्तम रित्या फिट्ट बसेल.

संघटना म्हणजे उदरनिर्वाह करण्याचे साधन नाही मात्र आज देखील आपल्याला लक्षात येईल की आपले व आपल्या बगल बच्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन म्हणून काही लोकांनी संघटना चालवत आणल्या, कामगार हित बाजूला ठेवून स्वहिताला प्राधान्य दिले. विविध नावाने यांनी सुशिक्षित बेरोजगार संस्था स्थापन करून कायदा पायदळी तुडवत सभासद कामगारांना देशोधडीला लावले व आपले आंधळे शासन प्रशासन याकडे दुर्लक्ष करत राहिले हे सत्य आहे.पण आपले कामगार काय करतात हा मुख्य सवाल आहे. या अन्याया विरोधात जर राज्यात कोणती संघटना लढत आहे तर ती म्हणजे महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ. हे माहीत असून देखील ज्या ज्या जिल्ह्यात कामगारांनी बघ्याची भूमिका घेतली तेथील परिस्थिती भयावह आहे.

पण एकीचे बळ मिळते फळ यावर ज्या ज्या कामगारांनी विश्वास ठेवून त्यांच्या पदाधिकारी यांनी दिलेल्या हाकेला साथ दिली त्या त्या जिल्ह्यात आज कामगार बऱ्यापैकी सुखी आहे. केवळ संघटनेच्या सुचनेचे पालन केले तरी समस्यां सुटतात हा अनुभव आहे पदाधिकारी घर दार सोडून लढतो व कामगार घरात पदरात लपून बसतात व न्यायची अपेक्षा बाळगतात हे चित्रच मुळात योग्य नाही आणि याच मुळे राज्यातील अनेक जिल्ह्यात हे संस्था चालक कंत्राटदार तुम्हाला त्यांच्या तालावर नाचवत आहेत. आपण आपल्या सहकारी मित्र कामगार नेता असलेल्या आपल्या संघटनेच्या पदाधिकारी यांनी दिलेल्या सुचनेचे पालन केल्यास सुरुवातीला काही दिवस त्रास होईल व सत्य परेशान हो सकता है पराजित नही या प्रमाणे आपला विजय १०० % होईल पण आपण आत्विश्वास गमावून बसलो आहोत तू करू शकतो तू हे चित्र बदलवू शकतो हेच तर आपल्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर,स्वामी विवेकानंद यांनी सांगितले पण आपण संघटनेच्या प्रवाहात आले पाहिजे मी एक नसून आम्ही हजार आहोत ही भावना महत्वाची आहे.

केवळ सदस्य फी भरली म्हणजे समस्यां सुटतात असे नाही तुला मुळे संकट आल्यावर सभासद होऊन काही अपेक्षा बाळगणे हे देखील चुकीचे वाटते. कामगार सक्रिय असला पाहिजे.आज व्हाट्सएपच्या ग्रुप व व्हिडिओ कॉन्फरन्स सारखी सुविधा आहे. प्रत्येक डिव्हिजन चा एक ग्रुप त्यात प्रत्येक सेक्शन सबडिव्हिजन व डिव्हिजन चे २ कामगार प्रतिनिधी ऍडमिन केले व त्यांनी आप आपल्या ऑफिस मधील कामगार त्यात जोडले तर किती वेळ लागतो ग्रुप व्हायला. या कामासाठी महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाच्या पदाधिकारी यांनी पुढाकार घ्यावा. व सर्व महाराष्ट्र भर सदस्य संख्या वाढवावी.

संघटना आली की शिस्त देखील आलीच संघटना आली की सदस्य नोंदणी आली जी कामगार कायद्याने गरजेची असते व त्याची नोंद जे फॉर्म द्वारे कामगार आयुक्त कार्यालयात असणे हे देखील तेवढेच गरजेचे असते. मात्र अनुभव असे आहेत की सभासद व्हायचे नाही व न्यायाची अपेक्षा बाळगायची. आपण सुशिक्षित आहोत तर आपण या काही गोष्टींची पूर्तता केली पाहिजे यात बळजबरी हा विषय नसून जबाबदारी व कर्तव्य ही भावना आल्यास समस्यां सुटतील. संघटनेने कोर्ट केस करून हजारो कामगारांना मा.न्याय देवतेच्या माध्यमातून नोकरीत संरक्षण दिले ते आपण स्वीकारले. त्यामुळे दर वर्षी संघटनेच्या या लाभ घेतलेल्या सर्व कामगाराने त्याची भासद फी, कोर्ट केस फी भरणे हे प्रत्येक कामगारांनी आपली जबाबदारी व कर्तव्य समजूनच संघटनेला सहकार्य केले पाहिजे. पान क्र. ८ वर



## कामगार संदेश पोहोचला अखिल भारतीय पातळीवर

महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघांच्या वतीने भारतीय मजदूर संघाच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने २३ जुलै २०२३ रोजी कामगार संदेश या परिपत्रकाचे उदघाटन झाले याचे स्वागत व कौतुक वेगवेगळ्या स्तरावर झाले आहे. दि २१ ऑगस्ट २०२३ रोजी अखिल भारतीय विद्युत मजदूर महासंघाचे महामंत्री मा.किशोरीलाल रायकवार, विद्युत क्षेत्र प्रभारी, भारतीय मजदूर संघ राष्ट्रीय सचिव मा.राधेशाम जयस्वाल, पुर्व भारतीय मजदूर संघ राष्ट्रीय उपाध्यक्ष मा.ऐल. पी.कटववार यांना वाराणसी येथे कामगार संदेश परिपत्रक अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघाचे महामंत्री सचिन मेंगाळे यांनी देवुन महाराष्ट्र विज कंत्राटी कामगार संघांच्या विविध आंदोलने , कोईटकेस, समान काम समान वेतन केस बाबतीत सविस्तर माहिती दिली. या वेळी कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी सतत कार्यरत राहुन प्रयत्न करणारे आपले सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांचे कौतुक करून राष्ट्रीय पातळीवर योग्य ते सहकार्य करून कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू असा विश्वास मान्यवरांनी दिला आहे.

पान क्र. ७ वरुन

संघटनेच्या सहकार्यातून आपले काम झाले की संघटनेकडे पाठ फिरवणारे अनेक कामगार आहेत. अनेक कामगार सभासद फी व कोर्ट केस फी भरत नाही, संघटनेच्या सूचना, नियम पाळत नाहीत तसेच संघटनेच्या राज्यपातळीवर अथवा स्थानिक पातळीवर पुकारलेल्या विविध आंदोलने, कामबंद आवाहनात सहभाग घेत नाही. काही कामगार सदस्य संघटनेच्या हिताच्या गोष्टी करत नाही किंवा संघटनेच्या विरोधी काही छुप्या कारवाया करतात हे कितपत योग्य आहे. अशा वागण्याने आल्याचं इतर कामगारांचे नुकसान होते. संघटना आली की शिस्त आली व जे कामगार शिस्त पालन करत नाहीत अशा कामगारांचा विचार कोणीच करत नाही हा समाजाचा शिरस्ता आहे पण ही वेळ कोणावर येऊ नये. म्हणूनच माझी संघटना ही माझी



गुरुवार दिनांक १७ ऑगस्ट २०२३ रोजी संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष मा.निलेश खरात व केंद्रीय उपमहामंत्री मा.राहुल बोडके यांनी सातारा सर्कलचे प्रभारी अधीक्षक अभियंता मा. हनुमंत ढोक साहेब यांची सातारा येथील कार्यलयात जाऊन भेट घेतली व सातारा सर्कल मधील ०६ अन्याय ग्रस्त वीज कंत्राटी कामगारांना पूर्ववत कामावर घेण्यासाठी विचारणा केली असता त्यांनी या ०६ कामगारांना पूर्ववत कामावर घेण्याच्या सूचना महावितरण प्रशासन व ठेकेदार यांना दिल्या,या मिटींगला भारतीय मजदूर संघाचे सातारा जिल्हा अध्यक्ष मा.श्यामराव गोळे साहेब, सचिव मा.रवींद्र माने तसेच महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाच्या केंद्रीय महिला सचिव मा.सीमा कदम, बारामती झोन संघटनमंत्री मा.समीर साबळे,सातारा जिल्हा अध्यक्ष मा. दिलीप शिंदे, मा.नितीन खुडे व मा. किरण निकम मा.शंकर कळसे इत्यादि उपस्थित होते.

# कंत्राटी कामगारांचे शोषण थांबवा

राज्यातील अनेक कंत्राटदार हे वीज कंत्राटी कामगारांना रोजगार देण्याच्या मोबदल्यात वेतनातून काही रकमा विशिष्ट पद्धतीने परत मागतात. काही कंत्राटदार हि रक्कम परस्पर खात्यातून वळती करतात तर काही मूळ वेतनातच देताना वजावट करून कामगाराला कमी वेतन देतात. काही ठिकाणी तर एकदाच आधीच ३० ते ४० हजार रुपये घेऊन मगच जॉइनिंग ऑर्डर देतात हे सत्य लपून राहिलेले नाही. हे सर्व पैसे आम्ही आमच्याकडे ठेवत नाही तर हे आम्हाला टेंडर मिळवण्यासाठी महावितरण च्या वरिष्ठ साहेबांना द्यावेच लागतात तरच टेंडर मिळते असे कंत्राटदार व त्यांचे हस्तक सर्व कामगारांना उघड उघड सांगतात. महावितरणच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांना पैसा देण्यासाठी कामगारांच्या कष्टाच्या घामाच्या मेहनतीच्या पैशावर दर महिन्याला दिवसा ढवळ्या कंत्राटदारांच्या माध्यमातून दरोडा टाकला जातो. हे कोणाला माहीत नाही. हे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री ऊर्जामंत्री प्रधान सचिव ऊर्जा, महावितरण चे व्यवस्थापकीय संचालक सर्वांना माहिती आहे. हा विषय लोकसभेत गाजला हा विषय विधानसभेत गाजला पण काही बदल होताना दिसत नाही.

खरेतर हि एक प्रकारची खंडणीच असते पण नाईलाजाने कामगाराला त्याच्या नियमित रोजगारासाठी ती द्यावी लागते. यातून विविध जिल्ह्यात अनेक वाद होत असतात, कोणी या बाबत तक्रार केली तर त्याला कामावरुन कमी केले जाते किंवा त्या कामगारांची बदली दूर अंतरावर करून एक प्रकारे शिक्षाच दिली जाते व याला महावितरण चे अधिकारी समर्थन देताना दिसतात याचा दुसरा अर्थ की कंत्राटदार जे सांगातात ते सत्य असावे का ?

तरी अनेक ठिकाणी अनेक वीज कंत्राटी कामगार संघटनेच्या माध्यमातून आपला स्वाभिमान जपत कंत्राटदारा च्या विरोधात प्रमुख नियोक्त्यां कडे या बाबत तक्रार करतात व याचा राग येऊन कंत्राटदार त्या कामगाराला कामवरून कमी करतात बदली करतात किंवा येन केन प्रकारे साम दाम दडं भेद वापरून ती तक्रार मागे घेण्यास भाग पाडतात.




यातूनच सांगली जिल्ह्यात झालेली एक ताजी घटना आहे ज्यामध्ये महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाच्या तासगाव तालुका अध्यक्ष मा.शंकर माळी या पदाधिकाऱ्याने तो कार्यरत असलेल्या केदारनाथ स्वयंरोजगार एजन्सी बाबत तक्रार दिली मात्र ही तक्रार मागे घ्यावी या साठी सदर एजन्सी च्या मालकाच्या सांगण्या नुसार केदारनाथ स्वयंरोजगार एजन्सी मालकाने नेमलेल्या हस्ताकाने थेट महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाच्या तासगाव तालुका अध्यक्ष मा.शंकर माळी यांच्या घरी जाऊन धमकी देऊन केदारनाथ स्वयंरोजगार एजन्सी बाबत दिलेली तक्रार मागे घेण्यासाठी दबाव आणला या झाल्या प्रकाराने त्या पदाधिकाऱ्यांनी रीतसर तासगाव पोलिसात तक्रार देण्याचा प्रयत्न केला मात्र नेहमी प्रमाणे पोलिसांनी त्याला सहकार्य न करताच त्यालाच भीती दाखवली.     झाल्या प्रकारची नोंद घेऊन संघटनेचे केंद्रीय कार्याध्यक्ष मा.अमर लोहार,  कोल्हापूर जिल्हा अध्यक्ष राहुल भालभर, कोल्हापूर संघटन मंत्री विजय कांबळे हे कोल्हापूर वरून तासगाव पोलीस स्टेशन येथे आले

सांगली जिल्हाध्यक्ष गणेश पाटील यांनी सांगली च्या सर्व कामगारांना आवाहन केल्या नुसार शेकडो कामगार पण उपस्थित झाले सर्व  तासगाव (सांगली) पोलीस स्टेशन मध्ये तळ ठोकून बसले तेव्हा कुठे पोलिसांनी तक्रार नोंदवून घेतली.

पान क्र. ९ वरुन...
तक्रारीची नोंद झाल्यानंतर संध्याकाळी पाच वाजता सर्व पदाधिकारी महावितरण सांगली सर्कल अधीक्षक अभियंता यांना भेटले व झालेला सर्व प्रकार सांगितला व सदर एजन्सी विरोधात पूर्वी दिलेल्या तक्रारी आणि सध्या झालेला प्रकार हे लक्षात घेऊन या एजन्सीला काळ्या यादीमध्ये टाकावे नाही तर सांगली जिल्ह्यातील सर्व वीज कंत्राटी कामगार हे प्रशासनाविरोधात बेमुदत आंदोलन पुकारतील हे ठणकावून सांगितले.

सांगलीचे जिल्हाध्यक्ष गणेश पाटील तसेच अन्य पदाधिकारी यांनी एकत्र येऊन लढा देण्याचे ठरवले त्या मुळे पोलिसांना देखील तक्रार घेणे भाग पाडले कामगारांनी एकजूट ठेवली तर काय होऊ शकते याचे हे उत्तम उदाहरण आहे.

अशीच एकी राज्यातील सर्व कंत्राटी कामगारांनी करावी व महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाच्या नेतृत्वाखाली लढायची तयारी ठेवावी, अन्याय आपल्या पासून अनेक हात दूर राहील या बाबत शंका नाही.

कामगार एकजुटीचा विजय असो




महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक मा.आण्णाजी देसाई साहेब सोलापूर दौऱ्यावर आले असता महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ सोलापूर कार्यकारणी च्या वतीने त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला त्या प्रसंगी ज्येष्ठ कार्यकर्ते अंनत मोडक, मयूर गवते, केंद्रीय पदाधिकारी राजकुमार काळे , जिल्हाध्यक्ष स्वप्नील कोरे, अजय माने इत्यादी प्रमुख पदाधिकारी व अन्य अनेक सभासद उपस्थित होते

---

## पुणे झोनमधील भोसरी,मंचर व राजगुरू नगर विभागातील बदल्यां संदर्भात संघटनेची भेट



पुणे झोनमधील भोसरी,मंचर व राजगुरूनगर विभागातील कोर्ट केकेस मधील कामगारांच्या बदल्या व काही कामगारांना कमी करण्याचे धोरण महावितरण प्रशासनाने केल्यामुळे संघटनेने वेळेत लक्ष घातले व सोमवार दिनांक ०८ ऑगस्ट रोजी महावितरण पुणे झोनचे उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मा. शिरीष काटकर साहेब यांना भेटून निवेदन देण्यात आले निवेदन दिल्यानंतर मी स्वतः या प्रकरणात लक्ष घालून पुणे झोनमधील कामगारांवर कुठल्याही प्रकारचा अन्याय होणार नाही याची काळजी घेईल असा शब्द त्यांनी या मीटिंगमध्ये दिला.

या प्रसंगी महावितरण पुणे झोनचे उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मा. शिरीष काटकर साहेब यांना निवेदन देताना संघटनेचे केंद्रीय उपमहामंत्री मा.राहुल बोडके, पुणे झोन अध्यक्ष मा.सुमित कांबळे, मंचर विभाग अध्यक्ष मा.राहुल हांडे, संघटनमंत्री मा.दीपक शिंदे, भोसरी विभाग अध्यक्ष मा.महेश वाघमारे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# राज्यातील अंगणवाडी सेविकांच्या मागण्या बाबत मा.ना.अदिती तटकरे यांना निवेदन



मुंबई : राज्यातील अंगणवाडी सेविकांच्या मागण्या बाबत चे निवेदन राज्याच्या महिला व बाल कल्याण मंत्री मा.ना.अदिती तटकरे यांना भारतीय मजदूर संघाच्या महाराष्ट्र अंगणवाडी कर्मचारी संघाच्या वतीने मंगळवार दिनांक २२ ऑगस्ट २०२३ रोजी मंत्रालयात देण्यात आले.लवकरच या अंगणवाडी सेविकांच्या मागण्या बाबत बैठक घेऊन दिलेल्या मागण्या बाबत सकारात्मक निर्णय घेऊ असे आश्वासन अदिती ताईंनी दिले असल्याचे अंगणवाडी प्रदेश अध्यक्षा सुरेखा गायकवाड यांनी कळवले. त्यांच्या सोबत शाकीरा सय्यद ललीता खांदे, कविता पाथरुट, शालन कटरे, इत्यादी महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.




# चंद्रयान -यानाचे चंद्रावर यशस्वीपणे लँडीग

दि.२३ ऑगस्ट २०२३ रोजी चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यान पोहचणारा भारत हा पहिला देश ठरला आहे. हा सर्व भारतीयांना अत्यंत अभिमानास्पद क्षण ठरला आहे. या बद्दल सर्व शास्त्रज्ञ,तंत्रज्ञ,प्रकल्पातील कामगार, कंत्राटी कामगार यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि शुभेच्छा व भारतीय मजदूर संघाच्या वतीने अभिनंदन. या वेळी भारतीय मजदूर संघ पुणे जिल्हा कार्यालयात मोठा जल्लोष करण्यात आला. पुणे जिल्हा कार्यालयात अध्यक्ष श्री.अर्जुन चव्हाण,अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघाचे सरचिटणीस सचिन मेंगाळे, उपाध्यक्ष अण्णा महाजन,श्रीमती बेबी राणी डे व ईतर पदाधिकारी उपस्थित होते.

## भारत माता की जय, जय हिंद